डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली-४१५ ७१२ जिल्हा-रत्नागिरी

जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/बांधकाम/अे—७/६०७/१७७५/२०१८ दिनांक : ०५.०३.२०१८

# निविदा सूचना क्र. ५२

विद्यापीठ अभियंता, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणी असलेल्या **स्थापत्य,विद्युत** ठेकेदाराकंडून बी—१ नमुन्यामध्ये (द्वि—लखोटा पध्दत) खालील कामांसाठी कार्यालयीन वेळेमध्ये (सुट्टीचे दिवस सोडून) मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सर्व कोऱ्या निविदा पत्रिका दापोली येथील विद्यापीठ अभियंता यांचे कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध होतील व सिलबंद निविदा विद्यापीठ अभियंता दापोली, ता.दापोली, जिल्हा.रत्नागिरी यांचे कार्यालयात स्विकारल्या जातील. निविदा खाली निर्देशित केलेल्या दिवशी (शक्य झाल्यास) उपस्थित ठेकेदार किंवा ठेकेदारांचे प्रतिनिधी यांचे समक्ष अथवा अनुपस्थितीत दापोली येथील मुख्यालयातील विद्यापीठ अभियंता यांचे दालनामध्ये उघडणेत येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम रूपये | इसाऱ्याची रक्कम रूपये | निविदा फॉर्म विक्रीचा कालावधी | निविदा सादर करावयची अंतिम तारीख वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ शक्य झाल्यास | निविदा पत्रिकेची किंमत रूपये | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दापोली येथील सर विश्वेश्वरय्या हॉल येथे कोलॅप्सीबल गेट लावणे ता. दापोली जि. रत्नागिरी (दुसरी मागणी) | १,००८५५ | ११००/— | ०९.०३.१८ ते १३.०३.१८ रोजी दुपारी १५.०० पर्यत | १५.०३.१८ रोजी दुपारी १५.०० पर्यत | १५.०३.१८ रोजी दुपारी १६.०० पासून | ५००/— | तीन महिने | वर्ग ९ |
| २ | दापोली येथील विद्यापीठाच्या प्रशासकिय इमारतीमधील कार्यकारी परिषद दालन येथील जुने व नादुरूस्त वातानुकुलीत यंत्रे बदलणे ता. दापोली जि. रत्नागिरी (दुसरी मागणी) | २,२६,९२८/— | २३००/— | ०९.०३.१८ ते १३.०३.१८ रोजी दुपारी १५.०० पर्यत | १५.०३.१८ रोजी दुपारी १५.०० पर्यत | १५.०३.१८ रोजी दुपारी १६.०० पासून | ५००/— | तीन महिने | वर्ग ड |
| ३ | दापोली येथील विद्यापीठाच्या प्रशासकिय इमारतीमधील आस्थापना (अ) या शाखेच्या विद्युतीकरणाचे नुतनीकरण करणे ता. दापोली जि. रत्नागिरी (दुसरी मागणी) | १,९५,८६२/— | २०००/— | ०९.०३.१८ ते १३.०३.१८ रोजी दुपारी १५.०० पर्यत | १५.०३.१८ रोजी दुपारी १५.०० पर्यत | १५.०३.१८ रोजी दुपारी १६.०० पासून | ५००/— | तीन महिने | वर्ग ड |

टिप: १. तांत्रिक व आर्थीक देकार उघडणे संदर्भातील दिनांकाबाबतची चौकशी कृप्या विद्यापीठ अभियंता, डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी **(फोन नं. ०२३५८—२८२४११, १२, १३)** कार्यालयाकडे करण्यात यावी.

१. कोऱ्या निविदा पत्रिकेची मागणी लेखी स्वरूपात करणे आवश्यक असून **कोऱ्या निविदा पत्रिकेचे मागणीचे वेळी फक्त** सार्वजनिक बांधकाम विभागाकडील आवश्यक त्या वर्गातील नोंदणीप्रमाणपत्राची प्रमाणीत **सत्य प्रत** सादर करावी आणि **सिलबंद निविदा बंद पेटीमध्ये सादर करतेवेळी** खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या **सत्य प्रती** सादर करणे बंधनकारक आहे.

१ सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीप्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत.
२ ठेकेदाराचे नांव/संस्थेचे नांव शासनाचे तसेच अन्य कोणत्याही संस्थेकडे काळ्या यादीत नसल्याबाबतचे नोटरी किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांचे समक्ष रु. १००/— मात्रचे कोर्ट फी स्टॅम्प वरील **स्वतंत्र** शपथपत्र. (निविदा प्रसिध्द केल्याच्या एक वर्ष आतील कालावधीचे).
४ ठेकेदाराकडे असलेल्या तांत्रिक कर्मचारी वर्गाची यादी.
५ ठेकेदाराकडे निविदेमध्ये दर्शविलेल्या योग्य त्या कामांसाठी आवश्यक यंत्रसामुग्रीची यादी.
६ जी.एस.टी. प्रमाणपत्र.
७ भागीदारी संस्था असल्यास भागीदारी करार (खालील मद्दा क्र. ५ नुसार).
८ मागील तीन वर्षात केलेल्या व सध्याहाती असलेल्या शासकीय व निमशासकीय कामांची संबधीत विभागाने दिलेली यादी.

**कंत्राटदार/कंपनीने प्राधीकृत केलेल्या व्यक्तीकडेच निविदा फॉर्म देण्यात येतील.**

सही/—
विद्यापीठ अभियंता

## सर्वसाधारण अटी व शर्ती

१. बयाणा रक्कम धनाकर्षाद्वारे (डी.डी.) स्विकारणेत येईल. धनाकर्ष हा डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडीया, सेन्ट्रल बँक ऑफ इंडीया, बँक ऑफ इंडीया इ. राष्ट्रीयकृत बँकेकडील किंवा रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या बँकेकडील असावा. धनाकर्ष हा Payble at Dapoli असणे अनिवार्य आहे. निविदेसोबत जोडण्यात

२. निविदा फॉर्म फी/इसारा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेमधुन कोणत्याही प्रकारची सूट अथवा सवलत मिळणार नाही.

३. भागीदारी कपंनीच्याबाबतीत निविदा सादर करतेवेळी त्यांना भागीदारीचे करारपत्रासोबत भागीदारांचे फोटो व नोंदणी केलेले भागिदारी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. फक्त विषयांकीत कामाकरीता जर भागीदारी संस्था(जॉइन्ट व्हेन्चर)सीापन करणेत आली असेल व अशी भागीदारी करून आवश्यकत्या नोंदणीची अर्हता धारण करण्याचा प्रयत्न केला आहे,असे या कार्यालयाचे तांत्रिक देकार उघडण्यात आल्यावर निदर्शनास आल्यास त्यांचेबाबतीत आर्थिक देकार(लखोटा क्र.२)उघण्यात येणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

४. आवश्यक यंत्र सामुग्री बाबतची माहिती तसेच भाडे तत्वावरील भाडेकरार सादर करणे आवश्यक असुन त्याच्या स्व:साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

५. शासन निर्णय क्र. बीसीए.२००९/प्र.क्र.१०८/कामगार ७—अ, दिनांक १७/६/२०१० अन्वये ईमारत व ईतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम १९९६ तसेच ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अनुषंगाने ठेकेदाराचे देयकामधून देयकाच्या रक्कमेच्या १ टक्के लेबर सेस वसूल करण्यात येईल.

६. ठेकेदाराने त्यांचे कामावर नेमणेत येणाऱ्या मजूरांचा विमा हा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र शासन, बांद्रा, मुंबई यांचेकडून प्राप्त करणे बंधनकारक आहे. त्यापोटी त्यांनी आवश्यक ते प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे. प्रमाणपत्र सादर न केल्यास शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार बिलांमधून विम्यापोटी येणाऱ्या रकमेची वजावट करणेत येईल याची नोंद घ्यावी.

७. खालील निर्देशित केलेल्या शासकीय करांची कंत्राटदाराच्या देयकामधून वेळोवेळी कपात केली जाईल.

| | | |
|---|---|---|
| **a) G.S.T.** | - | शासनाचे निर्देशानुसार जी.एस.टी. कराची टककेवारी ठेकेदाराचे देयकामधून वजावट करणेत येईल हे ठेकेदारावर बंधनकारक राहील. |
| **b) Income tax** | - | **As per rates fixed by Income Tax Department, Govt. of India** |
| **c) Labour Insurance** | - | **0.5 / 1.0 % will be deducted from the bills** |
| **d) Labour cess** | - | **1.0 % will be deducted from the bills.** |

८. जी.एस.टी. कराची वजावट करताना महाराष्ट्रातील निविदाधारकांनी निविदा सादर केल्यास १ टक्के एस.जी.एस.टी. टी.डी.एस. व १ टक्के सी.जी.एस.टी. टी.डी.एस. कपात करण्यात येईल व महाराष्ट्र राज्याबाहेरीत ठेकेदारांनी निविदा सादर केल्यास त्यांचेकडून अतिरीक्त २ टक्के आय.जी.एस.टी. टी.डी.एस कपात करणेत येईल. सदर करांची अंमलबजावणी शासनाचे निर्देशानुसार शासनाकडून निर्देश प्राप्त झाल्यावर करणेत येईल व ती ठेकेदारावर बंधनकारक राहील. निव्वळ देय होणाऱ्या रक्कम रु. २.५० लाखावरील देयकाकरीता जी.एस.टी. व आय.जी.एस.टी. कर लागु राहील.

९. वरील कामांचे सविस्तर निविदा सुचनेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१०. निविदा उघडण्याच्या तारखेला सुट्टी जाहीर झाली असल्यास त्या दिवसाचे कामकाज लगतच्या पुढील कामकाजाच्या दिवशी पार पाडणेत येईल.

११. **अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यास त्यांच्या स्विकृती संदर्भात अनुसरण्याच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांबाबतचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्र. बीडीजी२०१६/प्रक./२/इमारती/२ दिनांक २७/०६/२०१७ या शासन निर्णयाचे निविदाकारांनी निविदा सादर करतेवेळी पालन करावे.**

१२. ज्या निविदाकारांची कागदपत्रे खोटी आढळुन येतील अशा निविदाकाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

१३. ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकारण्यात येईल, त्या कंत्राटदारास रू १००/— मात्रचे कोर्ट फी स्टॅम्पवर या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये करारनामा करून द्यावा लागेल.

१४. इतर अटी व शर्ती निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नामंजूर करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

१५. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित झालेले व भविष्यात होणारे शासन निर्णयातील तरतुदींना अधिन राहून निविदा विषयक अंतिमीकरणाचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे रहातील.

१६. अधिक माहितीसाठी विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचेकडे कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदाकारास संपर्क साधता येईल.

सही/—

**विद्यापीठ अभियंता,**
**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण**
**कृषि विद्यापीठ, दापोली**

**प्रत विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्यांना माहितीसाठी सविनय सादर**

प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी —

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना माहितीसाठी सविनय सादर

२. मा. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषद, सर्व्हे नं. १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर
२/— यांना कळविण्यात येते की, प्रस्तावित निविदा उघडण्याच्या तारखेला कृप्या आपला प्रतिनिधी पाठवावे हि विनंती.

३. शिक्षण संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

४. संशोधन संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

५. संचालक विस्तार शिक्षण, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

६. नियंत्रक, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

७. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, दापोली / कृ.अ.त.म.,दापोली / वनशास्त्र महाविद्यालय, दापोली / का.प.व्य.प.संस्था,किल्ला रोहा / मत्स्य महाविद्यालय, शिरगांव / उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे

८. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना कळविण्यात येते की सदरची निविदा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.